दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १९२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.१२ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# उरणमधील मच्छीमारांना मिळणार ९५ कोटींची भरपाई

**दै.रायगड नगरी । उरण**

पर्यावरणाचा ऱ्हास करून प्रकल्प उभारणाऱ्या जेएनपीटी ओएनजीसी आणि सिडको प्राधिकरणाने उरण तालुक्यातील मच्छीमारांना ९५ कोटी १९ लाखांची नुकसान भरपाई द्यावी असा आदेश पुण्याच्या राष्ट्रीय हरित लवादाने दिला आहे. त्याला तीनही प्राधिकरणाने सुप्रीम कोर्टात आव्हान दिले होते. मात्र आता या तीनही प्राधिकरणाने मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्याची तयारी दर्शविली आहे.

मच्छीमाराना ९५ कोटी १९ लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याचा निकाल हरित लवादाने २०१५ सली दिला होता. मात्र या निर्णयाविरोधात जेएनपीटी ओएनजीसी आणि सिडको यांनी सुप्रीम कोर्टात अपील केले होते. मात्र सुप्रीम कोर्टाच्या निर्णया आधीच तीनही प्राधिकरणाने या पारंपारिक मच्छीमराना नुकसान भरपाई देण्याची तयारी दर्शवली आहे. उरण तालुक्यातील पारंपारिक मच्छिमार बचाव कृती समितीच्या वतीने रामदास कोळी आणि इतर मच्छीमारांनी पुणे येथील राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण पश्चिम विभाग यांच्याकडे याचिका दाखल केली होती. उरणच्या विविध भागात प्रकल्प राबविल्याने येथील पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे.

याशिवाय जेएनपीटी ओएनजीसी व सिडको या तीनही प्राधिकरणांकडून मच्छीमारांच्या उदरनिर्वाहाच्या साधनांवर गदा येत आहे. या याचिकेत केंद्रीय पर्यावरण आणि वनविभागाचे सचिव केंद्रीय नौकानयन मंत्रालय स्वास्थ आणि पुनर्वसन विभाग मुंबई, शेती आणि एडीएपी विभाग मुंबई आदी दहा प्राधिकरणांना प्रतिवादी केले होते. या प्रकरणी जेएनपीटी ओएनजीसी आणि सिडको यांनी या भागात विकास करताना येथील समुद्रात भराव केल्यामुळे त्याचा परिणाम येथील हनुमान कोळीवाडा, उरण कोळीवाडा, गव्हाण कोळीवाडा मच्छीमारांवर झाल्याचे म्हटले आहे.



# फलाट नसलेल्या मार्गावर दिवा-रोहा गाडी थांबवल्याप्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी

## अभिजित पाटील यांची मध्य रेल्वे जनरल मॅनेजर यांच्याकडे मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**



शनिवारी (दि.८ऑक्टोबर) पनवेल स्थानकात सकाळी साडे नऊच्या सुमारास दिवा–रोहा गाडी पकडताना मोठी दुर्घटना टळली आहे. यावेळी पनवेल स्थानकात निर्माण झालेल्या गोंधळाला नेमके जबाबदार कोण आहे याची चौकशी होणे गरजेचे आहे. या अनुषंगाने पनवेल रेल्वे स्थानकात फलाट नसलेल्या मार्गावर दिवा–रोहा पॅसेंजर गाडी थांबवल्याप्रकरणी मध्य रेल्वेने समिती नेमून या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी मध्य रेल्वे सल्लागार समिती सदस्य अभिजित पाटील यांनी मध्य रेल्वे जनरल मॅनेजर,भारत सरकार यांच्याकडे केली आहे.

पनवेल रेल्वे स्थानकात दररोज लांबपल्ल्याच्या गाड्यांची मोठी वर्दळ असते. त्यातच रोज सकाळी गाडी पकडण्यासाठी पनवेल रेल्वे स्थानकात मोठ्या संख्येने प्रवासी येजा करीत असतात. शनिवारी सकाळी दिवा–रोहा या गाडीने अचानक ट्रॅक बदलल्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. आणि गाडी पकडण्याच्या नादात प्रवाशांनी जीवाची पर्वा न करता रेल्वे रूळ ओलांडला. या घटनेमुळे निर्माण झालेल्या गोंधळाला जबाबदार कोण? ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे. अशा प्रकारे रेल्वे प्रशासनाकडून गोंधळ होतोच कसा? असा सवाल करीत अभिजीत पाटील यांनी मध्य रेल्वेचे जनरल मॅनेजर अनिल कुमार लाहोटी यांना लेखी पत्र देखील पाठवले आहे. या पत्राद्वारे त्यांनी पनवेल स्थानकात घडलेल्या गंभीर प्रकरणाची माहिती देऊन मध्य रेल्वेने तात्काळ एक समिती नेमून या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

अभिजीत पाटील यांनी जनरल मॅनेजर, मध्य रेल्वे– भारत सरकार यांना दिलेल्या पत्रात म्हंटले आहे की, पनवेल रेल्वे स्थानकावर शनिवार दि.८ ऑक्टोबर रोजी दिवा–रोहा पॅसेंजर रेल्वे पकडण्यासाठी प्रवाशांनी फलाटावरून उड्या मारून मालगाडीवर चढून रेल्वे पकडली. पनवेल स्थानकात दिवा–रोहा पॅसेंजर फलाट क्रमांक ५ वर थांबणार होती. मात्र ही पॅसेंजर अचानकपणे मालगाडीच्या ट्रॅकवर लागल्याने प्रवाशांची रेल्वे पकडण्यासाठी एकच धावपळ उडाली. रेल्वे काही सेकंदातच सुटणार असल्याने प्रवाशांनी गाडी पकडण्यासाठी आपल्या जीवाची पर्वा न करता रेल्वे रूळ ओलांडण्यास सुरुवात केली. सुदैवाने यादरम्यान रेल्वे रूळ ओलांडताना या मार्गावर एखादी जलद गाडी न आल्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. त्याचबरोबर रेल्वेकडून गाडी कोणत्या प्लॅटफॉर्मवर येणार याची घोषणा करण्यात आली नव्हती. त्यामुळे नियमित याच प्लॅटफॉर्मवर गाडी येणार असा अंदाज प्रवाशांनी बांधून ते रेल्वेची वाट पाहत होते. यामध्ये जेष्ठ नागरिक, महिला, बालक व अपंगांचा समावेश असल्याने रेल्वे प्लॅटफॉर्म नसलेल्या ठिकाणी थांबविल्याने प्रवाशांनी गाडी पकडण्यासाठी प्लॅटफॉर्मखालील रुळ ओलांडण्यासाठी एकच पळापळ केली. या दरम्यान इतर कोणतीही जलद रेल्वेगाडी न आल्याने जरी मोठा अनर्थ टळला असला तरीही याबाबत नेमकी चूक कोणाची झाली, याविषयी स्थानिक प्रबंधकांनी कोणतीही माहिती प्रवाशांना दिली नसल्याचे प्रवाशांकडून बोलले जात आहे. परंतु घडलेल्या या प्रकाराबद्दल मध्य रेल्वेकडून एका समितीची नेमणूक करावी आणि या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी मध्य रेल्वे सल्लागार समिती सदस्य अभिजित पाटील यांनी केली आहे.

# शुद्ध व नियमित पाणी पुरवठ्यासाठी लाडवलीतील शेकडो नागरिक धडकले कोकण आयुक्त कार्यालयावर




**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील गुळसुंदे ग्राम पंचायत हद्दीतील आदिवासीं व इतर गावकऱ्यांची फसवणूक करून त्यांना पाताळगंगा नदीचे प्रदूषित पाणी पाजून जीवाशी खेळणाऱ्या पनवेल पं.स.चे अकार्यक्षम गटविकास अधिकारी संजय भोये व इतर संबंधितांवर दंडात्मक कारवाई करून एमआयडीसी कडून नवीन वॉटर टॅपिंग घेऊन मंजूर जल जीवन मिशन योजना तात्काळ कार्यान्वित करून गुळसुंदे ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासी व इतर ग्रामस्थांना शुद्ध व नियमित पाणी पुरवठा करण्यात यावा. ह्या मागण्यांसाठी ग्राम संवर्धन सामाजिक संस्था,बांधनवाडी व आदिवासी ग्रामस्थ लाडविली यांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कोकण आयुक्त कार्यालयावर हंडा मोर्चा काढण्यात आला.

सुमारे चारशे ग्रामस्थ महिला व आदिवासी बांधव या मोर्चात सहभागी झाले होते दरम्यान पोलिसांनी मोर्चा अडवल्यानंतर मोर्चेकरांचे शिष्टमंडळ कोकण आयुक्त कार्यालयात चर्चेसाठी नेण्यात आले यावेळी शेकडो संतप्त मोर्चेकरांनी शासनासह निष्क्रिय आमदार खासदार जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्या पासून ग्रामपंचायतच्या सरपंच पर्यंतच्या सर्व लोकप्रतिनिधींच्या विरोधात घोषणा दिल्या व उपायुक्त गिरीश भालेराव व उपायुक्त (आस्थापना) श्री पाटील यांना ग्रामस्थ पीत असलेले दूषित पाणी देण्यात आले व पुढील पंधरा दिवसात आमच्या मागण्यांवर ठोस निर्णय न झाल्यास आझाद मैदानात आमरण उपोषणाचा इशारा मोर्चेकऱ्यांनी दिला.

यावेळी मोर्चाचे नेतृत्वकर्ते सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, ज्योती जयवंत पाटील,रेखा किसन कालेकर, राजश्री राजेंद्र म्हामणकर, दर्शना देविदास,म्हामणकर नीता नरेश वाघे, राजश्री, राजेश भोसले,प्रशाली परशुराम शेडगे, जयवंत पाटील, सामाजिक कार्यकर्त्या केशर पाटील, सरिता पाटील ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते राजू पाटील,आशा सखाराम शेडगे, सविता गणपत पवार, राम पवार, बेबी पवार, सुरेखा सुरेश वाघे, मारुती पाटील (पोलीस पाटील) , महेश पाटील, बाळा पाटील उपस्थित होते.

# उरणच्या वीजनिर्मिती केंद्रातील बॉयलर स्फोटातील तिसऱ्या कामगाराचाही दुर्दैवी मृत्यू

## व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळे ३ कामगार जिवाला मुकल्याने ग्रामस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात हळहळ

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील बोकडविरा येथील वायू विद्युत निर्मिती केंद्रात ९ ऑक्टोबर २०२२ रोजी दुपारी १२ : ३० वाजण्याच्या दरम्यान झालेल्या बॉयलरच्या झालेल्या भीषण स्फोटात सहाय्यक अभियंत्यासह तीन कामगार ८० ते ८५ टक्के भाजले होते. त्यातील विवेक धुमाळे याचा हायप्रेशरच्या वाफेच्या होरपळून जागीच मृत्य झाला. बोकडविरा येथील दुसरा कामगार विष्णू पाटील हा नवी मुंबई येथील रुग्णालयात उपचार घेत असतांना मरण पावला.तर डोंगरी येथील रहिवासी असलेला तिसरा कामगार कुंदन पाटील अत्यवस्थ असल्याने तीन दिवस मृत्यूशी झुंज देत असतांना काल दुपारी १२ : ३० वाजता नवीमुंबई रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत असतांना त्याची प्राणज्योत मालवली.

या वायू विद्युत केंद्राच्या दुर्घटनेतील एका सहाय्यक अभियंत्यासह तीन कामगारांना त्यांचा काहीही दोष नसतांना जीवाला मिखावे लागले आहे.सोमवारी १० ऑक्टोबरच्या रात्री कामगार विष्णू पाटील यांचा मृतदेह वायू विद्युत निर्मिती केंद्राच्या प्रवेशद्वाजवळ आणण्यात आला होता. व्यस्थापणाने मूत कामगारांच्या वारसांच्या भविष्यासाठी त्यांचा न्याय हक्क त्यांना मिळावा या मागणीसाठी प्रयत्न केले. मात्र निर्धास्त असलेल्या प्रशासन अधिकाऱ्यांनी मृत कामगारांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्या ऐवजी सरकारी नियमांचे पाढे वाचण्याशिवाय विशेष काही मदत देण्यावर भर दिलाच नाही.

एकंदरीत प्रकल्पातील दुर्घटना ही हल–गर्जीपणातून झाली असल्याचे स्पष्ट होत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

अशा अनेक त्रुटीवर आधारित हा प्रकल्प कार्यरत आहे. असे अनेक गौप्यस्फोट केल्याने कालच्या बॉयलरच्या स्पोटापेक्षा त्यांनी केलेला गौप्यस्फोट जबरदस्त होता. याच प्रत्यय प्रकल्पात अनेकवेळा आल्याचेही त्यांनी कबुल केले आहे.

उरण तालुक्यात ओएनजीसी, बीपीसीएल,जेएनपीए, धुतुम परिसरात अशाच अतिज्वलनशील रसायनांचा, खनिज तेलाचा, डीझेल, नाफ्ताचा, एलपीजीचा, खाद्य तेलाचा साठा साठविण्याची सोय येथील प्रचंड टाक्यांमध्ये आहे. हजारो मेट्रिक टनाच्या हिशेबात या ज्व–लनशील पदार्थाची उलाढाल दैनदिन होत असते. ती हाताळतांना सर्वप्रथम कामगाराच्या सुरक्षते विषयी नेमके कोणते धोरण अमलात आणले गेले.

याबाबत गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टीने कंपनी काही ठोस पावले उचलते का? कामगारांना कंपनीत सुरक्षा जॅंकीटे दिलेली आहेत का? हे तपासून पाहण्याची निर्माण झाली आहे. त्याच बरोबरीने कंपनीच्या आतील अग्निशमन साधने, स्वंयचलीत यंत्रणा योग्य प्रकारे कार्यरत आहेत का ? याचीही वेळोवेळी दक्षता घेणे गरजेचे आहे.काही वर्षा पुत्वी राज्य वीज निर्मिती गॅस टर्बाइनच्या याच प्रकल्पात रात्रीच्या वेळी अशाच प्रकारे बॉयलरचा स्पोट झाला होता व त्यावेळी येथिल प्रचंड मोठी विद्युत मोटार २५ फुटापेकशाही लांब उडाली होती. तर अशाच प्रकारचा हादरा २५ ऑक्टोबर २००८ रोजी शॉर्टसर्किटमुळे उडालेल्या स्पार्किंगमुळे घडला होता. या मध्ये तीन कर्मचारी होरपळले होते. त्यापैकी एकाचा मृत्यू झाला होता. आत्ता बॉयलर स्फोटात तीनही कामगारांचा मृत्यू झाला आहे.



# बाजारपेठेत पारंपरिक कंदिलांसह मातीच्या आणि डिझायनर पणत्या घेण्याकडे नागरिकांचा कल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातील बाजारपेठांमध्ये लागला असून दिवाळीच्या वस्तूंनी बाजारपेठ्या सजल्या आहेत. दिवाळी पंधरवड्यावर येऊन ठेपली असताना निरनिराळ्या रंगाच्या पणत्या, रांगोळ्या, आकाश कंदील, फटाके, सुगंधी उटणे, तसेच विद्युत रोषणाईची तोरणे आणि फराळाच्या पदार्थांनी बाजारपेठा सजल्या आहेत. या वस्तूंच्या खरेदीसाठी ग्राहकांनी बाजारपेठेत गर्दी केली आहे.

पारंपरिक मातीच्या पणत्याबरोबर चिनी मातीच्या डिझायनर पणत्या बाजारपेठेत दाखल मातीच्या पणत्याऐवजी पारंपरिक मातीच्या आणि डिझायनर पणत्या घेण्याकडे नागरिकांचा कल अधिक असल्याचे दिसून येत आहे. बाजारात मातीच्या पणत्या २५ ते ३० रुपये डझन तर चिनी मातीच्या पणत्या ४० ते ६० रुपये डझन आहेत. याशिवाय डेकोरेटिव्ह पणत्याही बाजारात उपलब्ध असून २० रुपयांना दोन या दरात उपलब्ध आहेत. बाजारामध्ये रांगोळ्या काढण्यासाठी विविध डिझाइनच्या गोल आकारच्या जाळी विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत. यामध्ये मोर, पावलं, देवी–देवता, फुलं, वेली अशा अनेक प्रकारच्या डिझाइन उपलब्ध आहेत. याची किंमत २० ते ४० रुपयांपर्यंत आहे. पारंपरिक रांगोळ्यांची मागणी फारशी कमी झाली नसली तरी गृहिणींकडून रांगोळ्या उपलब्ध असून शुभ चिन्हांच्या स्टिकर्सचा समावेश आहे. या शिवाय ठिपक्यांच्या रांगोळीच्या डिझाइनचे स्टिकर, संस्कारभारती रांगोळीचे स्टिकर्सही उपलब्ध आहेत. बाजारात पारंपरिक आकाश कंदिलाबरोबर चायना मेड आकाशकंदीलही विक्रीसाठी आले आहेत. मात्र देशी बनावटीचे आकर्षक कंदील घेण्याकडचे लोकांचा कल असल्याचे दिसून येत आहे. प्लास्टिकचे कागदी मिश्र रंगाचे कंदील बाजारात दिसून येतात. प्लास्टिकचे साधे कंदील ५० रुपयांपासून आहे. तर चायना कंदील १५० रुपयांपासून किमती आहेत. फिरकी, चांदणी, झालर आदी प्रकारामध्ये कंदील पाहायला मिळत आहेत.



# एकनाथ शिंदे यांना 'ढाल तलवार', निवडणूक आयोगाचा निर्णय

**दै.रायगड नगरी । मुंबई**

केंद्रीय निवडणूक आयोगाने शिंदे गटाला काल 'बाळासाहेबांची शिवसेना' हे नाव दिल्यानंतर आज ढाल तलवार चिन्ह बहाल केलं आहे. शिंदे गटाने काल दिलेले पर्याय निवडणूक आयोगाने नाकारले होते. त्यानंतर पुन्हा चिन्हांचे पर्याय देण्यासंबंधीचे निर्देश आयोगानो शिंदे गटाला दिले होते. आयोगाच्या सूचनेनंतर शिंदे गटाने आज दुपारपर्यंत पर्याय पाठवले होते. त्यानुसार निवडणूक आयोगाने बाळासाहेबांची शिवसेना अर्थात शिंदे गटाला ढाल तलवार चिन्ह दिलं आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने ठाकरे गटाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) असं नाव वापरण्यास परव–ानगी दिलेली आहे. तर शिंदे गटाला 'बाळासाहेबांची शिवसेना' असं नाव मिळालेलं आहे. दुसरीकडे आयोगाने ठाकरेंना मशाल चिन्ह दिलेलं आहे. तर शिंदेंकडे चिन्हासाठी आज सकाळी दहा वाजेपर्यंत तीन पर्याय मागितले होते. शिंदेंच्या पर्यायातून एक पर्याय निवडून निवडणूक आयोगाने सायंकाळी साडे पाच वाजताच्या दरम्यान बाळासाहेबांची शिवसेना गटाला ढाल तलवार चिन्ह प्रदान केलं.



एकनाथ शिंदे गटानं सूर्य हे चिन्ह मागितलं होतं. मात्र ते झोराम राष्ट्रीय पक्ष आणि द्रमुकशी संबंधित असल्यानं ते देण्यात आलं नाही. तर, ढाल तलवार हे चिन्ह पीपल्स डेमोक्रॅटिक मूव्हमेंटकडे होतं. मात्र ते पक्ष २००४ ला यादीतून वगळ्यात आल्यानं शिंदे गटाच्या 'बाळासाहेबांची शिवसेने'ला दोन तलवार आणि एक ढाल हे चिन्ह मिळालं.

ढालीनं जनतेचं रक्षण करायचं आणि दुश्मन अंगावर आलं तर तलवार उगारायची. शिंदे गटाला मिळालेलं ढाल तलवार चिन्ह एकदम परफेक्ट असल्याची प्रतिक्रिया आमदार भरत गोगावलेंनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना दिली.

शिंदे गट अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघात उमेदवार देणार का, ही निवडणूक लढवणार का, असा प्रश्न विच–ारला असता, बघू, आधी चिन्ह मिळणं गरजेचं होतं,असं उत्तर गोगावलेंनी दिलं. आम्हाला आग लावणारं चिन्ह नको होतं, असं म्हणत त्यांनी ठाकरे गटाच्या मशाल चिन्हावरून टोला लगावला.

# जैविक खत तंत्रज्ञान या विषयावर कार्यशाळा संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी मधील चांगु काना ठाकूर आर्ट्स , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) मध्ये जैविक खत तंत्रज्ञान या विषयावर कार्यशाळा पार पडली.

या कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुणे निवृत्त प्राध्यापक कॉलेज ऑफ इंजिनियरिंग पुणे, डॉ. महेंद्र रांजेकर आणि संचालक श्री.अमेय महेंद्र रांजेकर (ग्रीन व्हायटलस बायोटेक पुणे) तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.एस.के.पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी.डी.आघाव, विज्ञान विद्याशाखा प्रमुख डॉ. जे.एस.ठाकूर , रुसा समन्वयक डॉ.एस.एन. वाजेकर, लेखा व वित्त विभागाचे प्रमुख व इनक्युबेशन इनोव्हेशन सेलचे प्रमुख डॉ. निलेश कोळी, कार्यशाळेचे समन्वयक व सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. निलेश वडनेरे आदी उपस्थित होते.

प्राचार्य. डॉ.एस.के.पाटील सरांनी महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सव वर्षात सुरु असलेल्या सर्व उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. महाविद्यालय गेली २५ वर्षे विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू ठेवून त्याच्या सर्वांगीण विकासासाठी करत असलेल्या सर्व योजनांचा सखोल आराखडा मांडला. सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.निलेश वडनेरे यांनी कार्यक्रमांची रुपरेषा सांगून , प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

प्रमुख मार्गदर्शक डॉ. महेंद्र रांजेकर व श्री अमेय रांजेकर ह्यांनी विद्यार्थ्यांना जैविक खतांच्या निर्मितीची सखोल प्रक्रिया शिकवली. प्रात्यक्षिका दरम्यान विद्यार्थ्यांनी बायोरीएक्टर हाताळणे, तसेच बॉटल फिलिंग, सीलिंग आणि पॅकेजिंग ह्याचे प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणा दरम्यान संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी कार्यशाळेस भेट देऊन विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले तसेच इंडीयाना युनिव्हर्सिटी यु.एस.ए. विज्ञान विभागाचे डीन डॉ. जॉन डीटूसा व असोसिएट डीन डॉ. राजीव राजे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यशाळेचे सूत्रसंचालन सूक्ष्मजीवशास्त्राची विद्यार्थिनी कु. स्वलेहा आरिफ हिने केले, तसेच डॉ. अनुभा खरे यांनी या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, श्री.कैलास नारायण घरत, रा.पुष्पक वडघर, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या ताब्यातील पांडुरंग शंकर गायकवाड यांचा सिडकोचा भाडेपट्टा करारनामा, जगदीश पाटील यांचे माहितीच्या अधिकाराबाबतचे कागदपत्र, सागर घरत, कांता पाटील, सुजाता घरत यांची शोरुमची रिसीट, संजय तारेकर यांच्या नावाचे स्टॅम्प पेपर असे व इतर कागदपत्रे असलेली बॅग ही दि.१०/१०/२०२२ रोजी पनवेल परिसरात कुठेतरी पडून गहाळ झालेले आहेत. त्याबाबतची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यामध्ये दि.१०/१०/२०२२ रोजी मिसिंग रजिस्टर नं.२०४८/२०२२ अन्वये कायदेशीर नोंद केलेली आहे.

या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मिळकतीचे दस्तऐवज कोणाला सापडल्यास त्याचा कोणीही गैरवापर करू नये अन्यथा कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे दस्तऐवज कोणाला सापडल्यास खाली सही केलेल्या पत्त्यावर आणून द्यावेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांनंतर आलेल्या कोणत्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

दि.११/१०/२०२२ सही/-

**ॲड.कैलास नारायण घरत**
**रुम नं.१०१, जी.एस.घरत निवास, सेक्टर १, प्लॉट नं.१९६, नोड पुष्पक वडघर, एम.एफ.एं.एस.सी.कॉलेजजवळ, पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९५९४६५३७७७**

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दै.रायगड नगरी । खांब**

रोहे तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल विठ्ठलवाडी-राजखलाटी येथील विद्यार्थ्यांना मराठी व्हिजन फाऊण्डेशनच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला. या कार्यक्रमातंर्गत येथील विद्यार्थ्यांनी मराठी व्हिजन फाऊण्डेशनच्या वतीने विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.यावेळी या फाऊण्डेशनच्या अध्यक्षा रिया शिंदे व पदाधिकारी अर्चना दळवी, खुशाली नवतुरे, समिक्षा नलावडे,स्वप्नाली चव्हाण,मंगेश जाधव, हरिश्चंद्र चव्हाण, सदाशिव चव्हाण,संध्या मॅडम आदी उपस्थित होते.तर विद्यालयाचे वतीने मुख्याध्यापिका अर्चना मरवडे यांनी फाऊण्डेशनच्या या उपक्रमाचे मनापासून स्वागत करून त्यांच्या भविष्यकालीन वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जि.रायगड**

दूरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५१०४० / ४१ / ४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

पमपा/पर्यावरण/३९२२/प्र.क्र.०६/१४३/२०२२ दिनांक :११/१०/२०२२

### पनवेल महानगरपालिका पर्यावरण विभाग शुद्धीपत्रक

**निविदा : जाहीर सुचना - पमपा/पर्या.३९२२/प्र.क्र.६/१३७/२०२२**

**कामाचे नाव :- पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सन २०२३ चे माझी वसुंधरा अभियान राबविणेसाठी सल्लागार नेमणूक करणेबाबत.**

**वरील निविदेत खालीलप्रमाणे बदल करणेत येत आहे.**

**संबंधित सल्लागार यांनी सिलबंद निविदा महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागात दि.२०/१०/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावीत.**

**अटी व शर्ती**

**२) या कामी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा करून दि.२०/१०/२०२२ दुपारी २.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत पर्यावरण विभागात उपलब्ध होतील.**

**निविदेतील सर्व अटी व शर्ती पूर्वी प्रमाणेच राहतील.**

**सही/-**
**(कैलास गावडे)**
**उपायुक्त (पर्यावरण)**
**पनवेल महानगरपालिका**

## योगिनी पाटीलची बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्ण भरारी

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

कळंबोलीतील सुधागड विद्या विद्यालयातील अकरावीच्या वर्गात शिकणाऱ्या योगिनी पाटील हिने मुंबई येथे झालेल्या १८ व्या ज्युनियर मुलींच्या महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून विद्यालयाचे नाव उंचावले आहे. योगिनीने मिळवलेल्या सुवर्ण यशाचे विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र पालवे व शिक्षक कर्मचारी वर्गाने हार्दिक अभिनंदन केले आहे. आगामी काळातऑक्टोबरच्या अखेरीस इंफाळ, मणिपूर येथे होणाऱ्या ज्युनियर मुलींच्या राष्ट्रीय बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्यासाठी योगिनी पाटीलची निवड झाली आहे. केईएस हायस्कूलची विद्यार्थिनी उन्नती परदेशी हिने त्याच चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक मिळवले.

## CHANGE OF NAME

My old Name was **Meena Gopal Sawant** As per Affidavit No. 13636/22, Dt.11/10/2022 I will be known as **Mrs.Swapnali Suryakant Desai (New Name)** R/at : Shree Mata Apartment Room No.205, 2 nd Floor, Near Jari Mari Mandir, Pali Devad, Sukapur, New Panvel (E.), Tal-Panvel, Dist-Raigad-410206

**Mrs.Swapnali Suryakant Desai**
**(Sd/- New Name)**

## जाहीर नोटीस

आरटीएस अपिल क्र.६८/२०२२

प्रति,
१) शारदा जगन्नाथ जांभुळकर
रा.वडगाव, ता.खालापूर, जि.रायगड अपिलार्थी
विरुद्ध
१) संतोष जैतू गडगे
रा.वडगाव, ता.खालापूर, जि.रायगड
२) सुलोचना हिरु पाटील
रा.वाशिवली, ता.खालापूर, जि.रायगड
३) उज्वला कृष्णा गावंड
रा.दुरशेत, पो.जिते, ता.पेण, जि.रायगड
४) महेश किसनचंद छाब्रिया
रा.छाबरिया हाऊस, इराणीवाडी, कांदिवली, प.मुंबई-४०००६७
५) योगेश कमलाकर गडगे
रा.वडगाव, ता.खालापूर, जि.रायगड
६) सुमित सुनील गुप्ता
रा.रिलायन्स पंप, हाळखुर्द, खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड सामनेवाले

तमाम जनतेस तसेच सामनेवाले / प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : वडगाव, ता.खालापूर, जि.रायगड येथील फेरफार क्रमांक ८१५ बाबत मा.मंत्री (महसूल) यांचे न्यायालयातील क्रमांक आरटीएस-२८२१/प्र.क्र.४११/ज-४अ, मधील दि.२२/०६/२०२२ रोजीच्या आदेशान्वये या न्यायालयाकडील आरटीएस वि.मा. अर्ज क्र.३३/२०१६, दि.१९/१२/२०१६ रोजीचे आदेश रद्द करण्यात येवून प्रकरणी श्री.महादू हल्या गडगे (पाटील) यांचे वारस हक्काबाबत फेरफार नोंद क्रमांक ८१५ विरुद्ध अपिलार्थी / वादी यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये दि.१२/०८/२०२२ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले / प्रतिवादी हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी दि.११/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग, कर्जत, हायड्रो कॉलनी दहिवली, ता.कर्जत, जि.रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले क्र.४, ५ व ६ तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| मौजे वडगाव, ता.खालापूर, जि.रायगड | ७ | १ | ०-३७-२० | १.८७ |
| | ११ | १८ | ०-३५-०० | ०.३१ |
| | ३ | १ ब | ०-४७-०० | ४७०.०० |
| | ४४ | १ | ०-२२-७० | ३.१९ |
| | ८९ | २ | ०-०८-९० | ०.६६ |
| | ८९ | ६ | ०-१०-६० | ०.३१ |
| | ८९ | ८ | ०-१०-६० | ०.३१ |
| | ९४ | ४ | ०-३०-९० | १.६२ |
| | ९९ | ५ | ०-२०-०० | १.६९ |
| | १०० | ३ | ०-६४-०० | ४.७५ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

ठिकाण : कर्जत
दि.०४/१०/२०२२

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी**
**कर्जत उपविभाग कर्जतकरिता**

प्रो.जमा. २-२५ अर्जदाराचे वकील
अॅड.प्रवीण बा. म्हात्रे

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.१८२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०७/१२/२०२२

१) श्री.घनश्याम बुधाजी पाटील
वय : ४७ वर्षे, धंदा : शेती
रा.कंठवली, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड-४१०२०६
२) श्री.रामकृष्ण बुधाजी पाटील
वय : ५१ वर्षे, धंदा : नोकरी
रा.श्री राम समर्थ अपार्टमेंट, म्हातवली उरण, ता.उरण, जि.रायगड-४००७०२
३) सौ.मथुरा गजानन घरत
वय : ३९ वर्षे, धंदा : शेती व गृहिणी
रा.नवघर, पो.जेएनपीटी, ता.उरण, जि.रायगड-४००७०२
४) सौ.शांता प्रसाद घरत
वय : ५२ वर्षे, धंदा : शेती व गृहिणी
रा.धाकटी जुई, हरिश्चंद्र पिंपळे, ता.उरण, जि.रायगड-४१०२०६
५) सौ.शकुंतला गोविंद घरत
वय : ५८ वर्षे, धंदा : शेती व गृहिणी
रा.श्री साई गणेश को.ऑ.हौ.सो., बी-५, बी विंग, ता.उरण, जि.रायगड-४००७०२ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी कै.राधाबाई बुधाजी पाटील ह्या दि.१४/०५/२०१५ रोजी मु.कंठवली, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी मृत्यू पावले असून कै.राधाबाई बुधाजी पाटील यांचे नावे असलेल्या मौजे : वालटीखार, पागोटे, सावरखार, ता.उरण, जि.रायगड येथे सदरहू मिळकत क्र.अ या जमीन मिळकती होत्या. सदरहू मिळकती या शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरिता भूसंपादनात समाविष्ट केलेल्या आहेत. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन (मिळकत क्र.अ)
मौजे : वालटीखार, पागोटे व सावरखार, ता.उरण, जि.रायगड

| अ. क्र. | मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | वालटीखार | ३७ | १७ | ०-२५-६० | १३+९७/८६ |
| २ | वालटीखार | ३८ | ५ | ०-१६-३० | १३+९७/८६ |
| ३ | पागोटे | १७८ | ब/२ अ/पैकी | १-१२-० | ३२८ |
| ४ | सावरखार | १५४ | ग/५ | ०-५०-० | ३७/८६ |

तसेच कै.राधाबाई बुधाजी पाटील यांचे नावे सामाईक मालकी हक्क, ताबेकब्जा व वहिवाटीतील खालीलप्रमाणे शेतजमीन मिळकती होत्या व आहेत. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन (मिळकत क्र. ब)
मौजे : पागोटे व धुतूम, ता.उरण, जि.रायगड

| अ. क्र. | मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | पागोटे | १७८ | २ अ | ०-४५-४० पो.ख ०-०६-६० एकूण ०-५२-०० | ०.०० |
| २ | धुतूम | ३ | ५० | ०-०३-३० | ०.१२ |
| ३ | धुतूम | ५९ | १० | ०-२६-०० पो.ख. ०-०४-०० एकूण ०-३०-०० | ०.९१ |

कै.राधाबाई बुधाजी पाटील यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वरस आहेत. सदर वारसां व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.११/१०/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **सही/-**
**क.लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण** **दि.न्या.क.स्तर, उरण**

## म्हसळा तालुका विज्ञान प्रदर्शन सन २०२१-२२ निकाल जाहीर

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

कोरोनामुळे न होऊ शकलेले शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चे विज्ञान प्रदर्शन या वर्षी ऑनलाईन घेण्यात आले आणि म्हसळा तालुक्याने यात सुद्धा भरीव योगदान देऊन विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला, वैज्ञानिक दृष्टिकोनाला चांगल्या प्रकारे चालना दिली असे गौरव उद्गार या वेळी म्हसळा तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी संतोष दौंड यांनी व्यक्त केले.

विद्यार्थी गट इयत्ता ६ वी ते ८वी प्रथम क्रमांक रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कांदळवाडा चा विद्यार्थी प्रिन्स जयराम मोहिते मॉडेल विषय- मानवी श्वसन संस्थाप्रतिकृती ला जाहीर झाले तर द्वितीय क्रमांक रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रोहिणी ची आदिती सखाराम अंबाजी मॉडेल विषय- कचऱ्याचे विघटन आणि व्यवस्थापन या प्रतिकृती ला आणि तृतीय क्रमांक रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खरसई मराठी चा विद्यार्थी लावण्य प्रकाश शितकर मॉडेल विषय- आरोग्य आणि स्वच्छता यांना जाहीर झाले.

विद्यार्थी गट इयत्ता ९ वी ते १२ वी प्रथम क्रमांक न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा समर्थ मन्मथ निरणे मॉडेल विषय रोबोट. द्वितीय क्रमांक संयुक्त काळसूरी हायस्कूल विद्यार्थी सोहम अनंत कांबळी मॉडेल विषय- जलसंवर्धन वाहक वॉशिंग सेंटर आणि पांगळोली हायस्कूल विद्यार्थी आफाक धनसे मॉडेल विषय- इको फ्रेंडली बायो प्लास्टिक यांना तर तृतीय क्रमांक

अंजुमन हायस्कूल म्हसळा विद्यार्थी अब्दुल मोहित कमरोद्दीत बांगी मॉडेल विषय- स्मार्ट लाईट यांना जाहीर झाले. शैक्षणिक साहित्य प्राथमिक शिक्षक गटात प्रथम क्रमांक रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कांदळवाडा च्या सौ गुंडरे अश्विनी उमाकांत यांना, द्वितीय क्रमांक रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खरसई मराठी चे जयसिंग बेटकर यांना तर तृतीय क्रमांक आयडियल इंग्लिश स्कूल म्हसळा शेख नार्गीस यांनी प्राप्त केला.

शैक्षणिक साहित्य माध्यमिक गट शिक्षक प्रथम क्रमांक काळसुरी हायस्कूल किरण चाळके, द्वितीय क्रमांक पीएनपी माध्यमिक शाळा पाष्टी चे बिलाल शिकलगार, आणि तृतीय क्रमांक पीएनपी माध्यमिक शाळा पाष्टी चे विनयकुमार सोनवणे यांनी मिळवला. सदर विज्ञान मॉडेल परीक्षक म्हणून तळा येथील शिक्षक प्रमोद भांजी, माणगांव मधील शिक्षक रुपेश गमरे, कांबळे सर, प्रा. सलमा नाजिरी, प्रा शिरीन यांनी काम पहिले.

वरील विजेत्या सर्व विद्यार्थी,शिक्षक व शाळांचे तसेच सहभागी सर्व विद्यार्थी यांचे गटशिक्षणाधिकारी संतोष दौंड, शिक्षण विभाग पंचायत समिती म्हसळा व गणित विज्ञान अध्यापक मंडळ म्हसळा अध्यक्ष विनयकुमार सोनवणे, उपाध्यक्ष जयसिंग बेटकर, सचिव खेडेकर सर, सह सचिव सुनीता भोसले, कोशाध्यक्ष देवगावकर, रमेश जाधव, परीक्षा समिती सदस्य किरण चाळके, तांबे सर, अली सर, साधनव्यक्ती दीपक पाटील, नंदकुमार जाधव आणि संपूर्ण तालुका कार्यकारिणी यांच्या कडून हार्दिक अभिनंदन व पुढील होणाऱ्या विज्ञान प्रदर्शनासाठी शुभेच्छा दिल्या. या सर्व सहभागी ना लवकरकच सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल आणि विजेत्या स्पर्धेकाना चालू वर्षाच्या विज्ञान प्रदर्शन मध्ये सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येईल असे शिक्षण विभागाच्या वतीने जाहीर करण्यात आले.

मा.गोडसे साहेब कोर्ट
अर्जदारांतर्फे वकील
अॅड.एम.एस.पवार

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.१२३८/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.११/११/२०२२

१) श्रीमती.सुग्रा अब्दुल रहेमान शेख
वय : ७४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.इकबाल अब्दुल रहेमान शेख
वय : ५२, धंदा : व्यवसाय
३) श्री.लतीफ अब्दुल रहेमान शेख
वय : ५३, धंदा : व्यवसाय
१ ते ३ सर्व रा.५९९, इमाम हुसैन चौक, घोडबंदर रोड, जामा मस्जिद जवळ, कासारवडीवली, ठाणे, जि.ठाणे-४००६१५
४) श्रीमती.सईदा रमजान शेख
वय : ५२, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.४०२, गांधी चौक कर्जत रोड, मुस्लीम मोहल्ला, बदलापूर, जि.ठाणे अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटशीने कळविण्यात येत आहे की, पै.अब्दुल रहेमान शेख अली शेख उर्फ तेली हे दि.१६/०३/२०२२ रोजी कसारवडीवली, ठाणे, ठाणे येथे मयत झालेले आहेत. त्यांच्या खुद्द मालकीची व ताबेकब्जातील व वहिवाटीतील मौजे : धानसर येथे शेतजमीन आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : धानसर, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नं./गट | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | १८९ | ३/१ | ०-३५-०० पो.ख.०-०३-०० ०-३८-० | ०.३८ |
| २ | ६३ | ब/७/८ | ०-८६-०० | ९.०६ |

वरील वर्णनाच्या सदनिका मयत पै.अब्दुल रहेमान शेख अली शेख उर्फ तेली यांच्या मालकीची होती व आहे. यांच्या मिळकतीबाबत अर्जदार यांना आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता तसेच सदरहू मिळकत अर्जदार यांच्या नावे दाखल करून घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याच्या दृष्टीने योग्य असल्याने अर्जदार यांना मयताचा वारसदाखला मिळण्याकरिता मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल यांच्या कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जातील मिळकतीबाबत अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत योग्य त्या पुराव्यासह स्वतः अगर आपल्या वकीलामार्फत कोर्टात उपस्थित राहून हरकत घ्यावी. वरील मुदतीबाबत इतर कोणाचीही हक्क व हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे व सदरहू अर्जदारांना कोर्टाकडून योग्य तो हुकूम घेतील.

आज १० माहे १० /२०२२ रोजी आमच्या सह्या व कोर्टाच्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **सही/-**
**क.लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

